ePaper
अखंड देशाचा विकास न करणाऱ्या व्यक्तीच्या हाती देशाची सत्ता–शरद पवार!

| वर्ष - 7 | अंक - 219 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 17 डिसेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



## आतील पानांत

- एबी डिव्हिलियर्सचा मोठा खुलासा!
- वैष्णवीनं केले गंभीर आरोप
- करोनाचा नवा उपप्रकार आढळला
- आश्वासनांची पूर्तता केली नाहीतर

# ‘टीडीआर’ घोटाळ्याचा ‘मास्टर माईंड’ कोण?

## महापालिकेत संघटीत भ्रष्टाचार : टीडीआर लॉबी विरुद्ध शेखर सिंह संघर्ष पेटणार!

। पिंपरी । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।

**महापालिकेतील टीडीआर घोटाळा नागपूर हिवाळी अधिवेशनातील सर्वात चर्चेचा विषय ठरला. याबाबत महापालिकेत प्रकरण धुमसत असताना काही पुढाऱ्यांनी याबाबत पत्रव्यवहार केला. मात्र, त्याची उघडपणे वाच्यता करण्याचे धाडस का दाखवले नाही? असा प्रश्न पिंपरी-चिंचवडकरांना पडला आहे.**




शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांच्यापासून अनेकांनी या प्रकरणात चौकशी करण्याबाबत पत्र दिल्याचे सांगितले जात आहे. मात्र, विधानसभेत चर्चा होईपर्यंत कोणी उघडपणे बोलले नाही किंवा जाणिवपूर्वक हे प्रकरण विधानसभेत चर्चेत आणले, शंका उपस्थित केली जात आहे. वास्तविक, खासदार बारणे टीडीआर घोटाळ्याबाबत उघडपणे बोलणार नाहीत. कारण, हा विषय नगरविकास मंत्रालयाशी संबंधित आहे आणि राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नगरविकास खाते आहे. या प्रकरणात आयुक्तांपासून बडे अधिकारी ‘स्वाक्षरी’निशी ‘ऑन पेपर’ अडकण्याची शक्यता असून, थेट मुख्यमंत्र्यांपर्यंत प्रकरण जाणार असल्याने बारणे यांनी ‘स्थगितीचे पत्र’ दिले होते, असे निरीक्षण राजकीय जाणकार नोंदवतात.

दुसरीकडे, शहरात भाजपाचे तीन आमदार आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे एक आमदार आहेत. पण, यापैकी “केवळ भाजपाच्या तीन आमदारांचे घरगडी म्हणून आयुक्त शेखर सिंह काम करतात...” असा दावा करीत राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी संधीचा फायदा घेण्याचा प्रयत्न केला. काँग्रेसचे शहराध्यक्ष कैलास कदम यांनीही उडी घेतली. पण, हे प्रकरण विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्यापर्यंत कुणी पोहोचवले? ही खरी गंमत आहे.

### भाजपा आमदारांना ‘डॅमेज’ करणारी यंत्रणा कार्यरत...

२०१९ मध्ये महाविकास आघाडीची सत्ता आल्यानंतर शहरातील कचरा डेपोला लागलेली आग, भामा आसखेड जॅकवेल प्रकल्प, केबल डक्टींगच्या कामातील भ्रष्टाचाराचे आरोप थेट विधानसभा सभागृहात झाले. हॉर्स रायडिंगच्या वादात खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी उडी घेतली. शिवसेना आमदार सचिन आहेर यांनीही स्थानिक प्रश्नांमध्ये लक्ष घातले. शरद पवार गटाच्या माध्यमातून प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, आमदार रोहीत पवार यांनीही पिंपरी-चिंचवडमध्ये बारीक लक्ष नजर ठेवली आहे. असे असतानाही, टीडीआर घोटाळ्याचा विषय विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्यामाध्यमातून सभागृहात मांडण्यात आला. त्यामुळे शहरातील भाजपाची प्रतिमा ‘डॅमेज’ करण्यासाठी पर्यायायाने भाजपा आमदारांवर भ्रष्टाचाराची प्रकरणे शेकवण्यासाठी विशिष्ट यंत्रणा कार्यरत आहे, असा दावाही राजकीय जाणकार करतात.




### आयुक्त सिंह आता टीडीआर लॉबीच्या रडारवर...

आयुक्त शेखर सिंह यांनी भामा आसखेड जॅकवेल, केबल डक्टींगसारखा विषयांवर आरोप झालेले असतानाही ठाम भूमिका घेतली. आता टीडीआर प्रकरणातही नियमानुसारच टीडीआर दिल्याचा दावा आयुक्त करीत आहेत. शहरात भाजपाचे तीन आणि राष्ट्रवादीचे एक तसेच दोन खासदार आहेत. सत्ताधारी पक्षाचे पदाधिकारी आहेत. पण, तरीही आयुक्तांनी सुमारे १ हजार ६०० कोटी रुपयांचा टीडीआर व्यवहार केला. कुणाच्याही विरोधाला जुमानले नाही. त्यामुळे शेखर सिंह ‘टेक्निकली स्ट्राँग’ असतील. त्यामुळे पुन्हा एकदा शहरातील राजकीय नेत्यांची हतबलता सिद्ध झाली. याबाबत प्रसारमाध्यमांकडे खुलासा करताना शेखर सिंह यांनी ‘टीडीआर लॉबी’ चा उल्लेख केला. कारण, एव्हढ्या मोठ्या प्रमाणात बाजारात टीडीआर आल्यामुळे या क्षेत्रातील उद्योजकांचे अप्रत्यक्ष नुकसान होणार आहे. घोटाळ्याच्या आरोपामुळे या क्षेत्रातील अस्वस्थताही वाढली आहे. त्यामुळे आयुक्त सिंह आता ‘टीडीआर लॉबी’च्या रडारवर राहणार आहेत, असे निरीक्षण जाणकारांनी नोंदवले आहे.

# तळवडे आग दुर्घटनेतील मृतांची संख्या १२ वर!

## आणखी एका जखमी महिलेचा मृत्यू : महापालिका आयुक्तांनी व्यक्त केला शोक

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड परिसरातील तळवडे येथील कारखान्यात झालेल्या आग दुर्घटनेतील जखमी रुग्ण सुमन गोधडे (वय ४० वर्षे) यांचे रात्री दोन वाजता ससून रुग्णालयामध्ये उपचारादरम्यान आज निधन झाले.**

ही अत्यंत दु:खद घटना असुन कुटुंबियांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत, अशा शब्दांत आयुक्त शेखर सिंह यांनी दु:ख व्यक्त केले आहे. तळवडे येथील एका कारखान्यामध्ये दि. ८ डिसेंबर रोजी घडलेल्या आग दुर्घटनेत ६ जणांचा घटनास्थळी मृत्यू झाला होता तर १० जण जखमी झाले होते. जखमींना पुढील उपचारांसाठी तातडीने पुणे येथील ससून रुग्णालयात पाठविण्यात आले होते. त्यातील प्रतिक्षा तोरणे (वय



१६ वर्षे) आणि कविता राठोड (वय ४५ वर्षे) यांचे दि.९ डिसेंबर रोजी तर शिल्पा राठोड (वय ३१ वर्षे) यांचे दि. १० डिसेंबर रोजी ससून रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. तर प्रियंका यादव (वय ३२ वर्षे) आणि अपेक्षा तोरणे (वय १८ वर्षे) यांचे दि.१४ डिसेंबर रोजी उपचारादरम्यान निधन झाले. आज आणखी एक जखमी महिलेचे निधन झाल्याने तळवडे आग दुर्घटनेतील आतापर्यंतच्या मृतांची संख्या १२ इतकी झाली आहे. या घटनेतील जखमी रुग्ण उषा पाडवी, कोमल चौरे, रेणुका ताथोड आणि शरद सुतार यांच्यावर ससून रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

### अवैध उद्योग, बांधकामांवर निर्बंध घालणार...

तळवडेतील आग दुर्घटनेनंतर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मालमत्तांचे सव्हेक्षण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. अपघात झालेल्या ठिकाणी सर्वेक्षणाचे काम हाती घेण्यात आले आहे. धोकादायक उद्योगांवर निर्बंध टाकण्याचे काम करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच अशा धोकादायक ठिकाणी सीसीटीव्ही बसविण्यात येत असून येऊन कंपनींच्या आत व परीसरातील अवैध कामांवर निर्बंध घालण्यात येईल, असाही दावा करण्यात आला आहे.

# सरकारचं तुमच्या आरोग्यावर लक्ष!

## आतापर्यंत दीड कोटीपेक्षा जास्त पुरुषांची तपासणी

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**निरोगी आरोग्य तरुणाईचे, वैभव महाराष्ट्राचे' अभियानाअंतर्गत आतापर्यंत १ कोटी ५९ लाख पेक्षा अधिक पुरुषांची मोफत आरोग्य तपासणी यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली आहे. तानाजी सावंत यांच्या संकल्पनेतून १८ वर्षांवरील पुरुषांच्या सर्वांगीण आरोग्य तपासणीसाठी १७ सप्टेंबरला हे अभियान सुरु करण्यात आले. या अभियानाअंतर्गत राज्यातील सुमारे ४ कोटी ६७ लाख पुरुषांची मोफत आरोग्य तपासणी करण्याचे उद्दिष्ट आरोग्य विभागामार्फत ठेवण्यात आले आहे.**

या अभियानाअंतर्गत १६ डिसेंबरपर्यंत १८ वर्षावरील १,५९,५१,४०९ पुरुषांची मोफत आरोग्य तपासणी पूर्ण करण्यात आलेली आहे. त्यापैकी १,५०,०७,७७५ लाभार्थ्यांचा आवश्यक त्या चाचण्या शासकीय आरोग्य संस्थांमध्ये करण्यात आलेल्या असून, त्यापैकी २१,८५,७०३ लाभार्थ्यांना औषधोपचार देण्यात आलेले आहेत. तर जवळपास १८,८०१ लाभार्थ्यांवर लहान-मोठ्या शस्त्रक्रिया सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत रुग्णालयांमध्ये करण्यात आलेल्या आहेत. ही मोहीम ३१ डिसेंबरपर्यंत राबविण्यात येणार असून, त्यानंतर गरजेनुसार मोहिमेचा कालावधी वाढविण्याचा निर्णय घेतला जाणार आहे. आरोग्यवर्धिनी केंद्र, उपकेंद्र, आरोग्यवर्धिनी केंद्र प्राथमिक आरोग्य केंद्र, शहरी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र, शहरी भागातील सामुदायिक आरोग्य केंद्र, शहरी आरोग्यवर्धिनी केंद्र व हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, सामान्य रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, संदर्भ सेवा रुग्णालय



या स्तरावर रुग्णांना आवश्यक सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. या सर्व आरोग्य संस्थांमध्ये १८ वर्षावरील पुरुषांची मोफत आरोग्य तपासणी, आवश्यक चाचण्या, गरजेनुसार ईसीजी, सिटीस्कॅन, एक्स-रे इत्यादी सुविधा मोफत दिल्या जाणार आहेत आणि गरजेनुसार रुग्णांना आवश्यक शस्त्रक्रिया सार्वजनिक आरोग्य विभागअंतर्गत रुग्णालयांमध्ये मोफत केल्या जाणार आहेत. त्याचप्रमाणे, गरजेनुसार रुग्णांना मोठ्या शस्त्रक्रियांसाठी वैद्यकीय महाविद्यालय व शासनमान्य महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत तसेच पंतप्रधान जन आरोग्य योजनाअंतर्गत नोंदणीकृत केलेल्या रुग्णालयांमध्ये संदर्भित केले जाणार आहे. माननीय मुख्यमंत्री व माननीय आरोग्यमंत्री यांच्या प्रेरणेतून सुरू असलेल्या 'निरोगी आरोग्य तरुणाईचे, वैभव महाराष्ट्राचे' या अभियानासाठी विशेष ॲपची निर्मिती करण्यात आलेली आहे. या ॲपच्या माध्यमातून सर्व आरोग्य केंद्रांच्या ठिकाणी आरोग्य कर्मचारी तसेच वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत रुग्णांची नोंदणी, त्यांना दिलेले औषध उपचार तसेच करण्यात आलेल्या शस्त्रक्रिया, करण्यात आलेल्या चाचण्या, या माहितीची नोंद त्या ठिकाणी केली जाते. या अभियानाअंतर्गत १६ डिसेंबरपर्यंत १८ वर्षावरील १,५९,५१,४०९ पुरुषांची मोफत आरोग्य तपासणी पूर्ण करण्यात आलेली आहे. त्यापैकी १,५०,०७,७७५ लाभार्थ्यांच्या आवश्यक त्या चाचण्या शासकीय आरोग्य संस्थांमध्ये करण्यात आलेल्या असून, त्यापैकी २१,८५,७०३ लाभार्थ्यांना औषधोपचार देण्यात आलेले आहेत. तर जवळपास १८,८०१ लाभार्थ्यांवर लहान-मोठ्या शस्त्रक्रिया सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत रुग्णालयांमध्ये करण्यात आलेल्या आहेत. ही मोहीम ३१ डिसेंबरपर्यंत राबविण्यात येणार असून, त्यानंतर गरजेनुसार मोहिमेचा कालावधी वाढविण्याचा निर्णय घेतला जाणार आहे. आरोग्यवर्धिनी केंद्र, उपकेंद्र, आरोग्यवर्धिनी केंद्र प्राथमिक आरोग्य केंद्र, शहरी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र, शहरी भागातील सामुदायिक आरोग्य केंद्र, शहरी आरोग्यवर्धिनी केंद्र व हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, सामान्य रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, संदर्भ सेवा रुग्णालय या स्तरावर रुग्णांना आवश्यक सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. या सर्व आरोग्य संस्थांमध्ये १८ वर्षावरील पुरुषांची मोफत आरोग्य तपासणी, आवश्यक चाचण्या, गरजेनुसार ईसीजी, सिटीस्कॅन, एक्स-रे इत्यादी सुविधा मोफत दिल्या जाणार आहेत आणि गरजेनुसार रुग्णांना आवश्यक शस्त्रक्रिया सार्वजनिक आरोग्य विभागअंतर्गत रुग्णालयांमध्ये मोफत केल्या जाणार आहेत.

### 18 वर्षांवरील पुरुषांची मोफत तपासणी

» ही मोहीम ३१ डिसेंबरपर्यंत राबविण्यात येणार असून, त्यानंतर गरजेनुसार मोहिमेचा कालावधी वाढविण्याचा निर्णय घेतला जाणार आहे. आरोग्यवर्धिनी केंद्र, उपकेंद्र, आरोग्यवर्धिनी केंद्र प्राथमिक आरोग्य केंद्र, शहरी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र, शहरी भागातील सामुदायिक आरोग्य केंद्र, शहरी आरोग्यवर्धिनी केंद्र व हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, सामान्य रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, संदर्भ सेवा रुग्णालय या स्तरावर रुग्णांना आवश्यक सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. या सर्व आरोग्य संस्थांमध्ये १८ वर्षावरील पुरुषांची मोफत आरोग्य तपासणी, आवश्यक चाचण्या, गरजेनुसार ईसीजी, सिटीस्कॅन, एक्स-रे इत्यादी सुविधा मोफत दिल्या जाणार आहेत आणि गरजेनुसार रुग्णांना आवश्यक शस्त्रक्रिया सार्वजनिक आरोग्य विभागअंतर्गत रुग्णालयांमध्ये मोफत केल्या जाणार आहेत.

# जेएसपीएम' मध्ये 'विकसित भारत अभियान' कार्यक्रम !

## आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांचे प्रोत्साहन : प्रमुख वक्ता म्हणून सलील अगरवाल यांची उपस्थिती

। पिंपरी । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पुणे जे.एस.पी.एम. च्या राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयात अमृत महोत्सवी विकसित भारत २०४७ या अभियाना अंतर्गत दि. २२ डिसेंबर २०२३ रोजी कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमास प्रमुख वक्ता म्हणून भारत हेवी इलेक्ट्रीकल्स लिमिटेडचे प्रोजेक्ट मॅनेजर सलील अगरवाल लाभलेले आहेत.सदर कार्यक्रमाला राज्याचे आरोग्य मंत्री व जेएसपीएम समुहाचे संस्थापक सचिव डॉ. तानाजी सावंत यांनी प्रोत्साहन दिले आहे.**




### विकसित भारत अभियान ही द्रष्टी योजना...

» पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची द्रष्टी योजना म्हणजे "विकसित भारत अभियान" भारताचा भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक विकास योग्य आणि सर्वव्यापी तंत्रज्ञान करू शकते हा ठाम विश्वास या उपक्रमाचा पाया आहे.परिवर्तनवादी आणि बुद्धिवादी समाज तेव्हाच घडू शकतो, जेव्हा आजचा विद्यार्थी सर्वांगीण विचार आणि शिक्षण घेण्यास उत्सुक असेल.'एआईसिटीइ'ने निवडलेले प्रमुख वक्ते हे उद्योजकता आणि संपूर्ण स्वावलंबन याचे पुरस्कर्ते आहेत.

सदर कार्यक्रमाचे आयोजन राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयाचे डॉ. बडधे हे करत आहेत.

त्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राकेश कुमार जैन, माजी प्राचार्य आणि ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. विटकर, जेएसपीएम विद्यापीठाचे अध्यक्ष डॉ. रवी जोशी यांचे मार्गदर्शन लाभलेले आहे.

# कारवाई विरोधात पथारीधारक आक्रमक!

## »बाबा कांबळे यांचा इशारा : ...अन्यथा महापालिकेला घेराओ

।पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**टपरी, पथारी, हातगाडी धारकांच्या मागण्या सोडविण्याएवजी महापालिका प्रशासन कष्टकऱ्यांवर जुलमी कारवाई करत आहे. त्याला राज्यकर्ते अप्रत्यक्ष पाठिंबा देत देत आहेत. ही अन्यायकारक कारवाई महापालिकेने थांबवावी. अन्यथा येणाऱ्या निवडणुकीत राज्यकर्त्यांना धडा शिकवू, व अधिक तीव्र आंदोलन करून महानगरपालिकेला घेरावा घालू असा इशारा टपरी, पथारी, हातगाडी पंचायतीचे संस्थापक अध्यक्ष बाबा कांबळे यांनी दिला. तसेच सातत्याने होणाऱ्या कारवाईच्या विरोधात महापालिका प्रशासनाचा निषेध केला.**



शहरातील टपरी, पथारी, हातगाडीधारकांवर महापालिका प्रशासन सातत्याने अतिक्रमण कारवाई करत विरोधात टपरी, पथारी, हातगाडी पंचायतीच्या वतीने बाबा कांबळे यांच्या नेतृत्वात महापालिकेवर आंदोलन करण्यात आले.

फळभाजी विक्रेता, कष्टकरी महिला व आशा कांबळे यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आंदोलनाला सुरुवात करण्यात आली. पुतळ्यापासून महापालिकेच्या प्रवेशद्वारापर्यंत ही रॅली आयोजित करण्यात आली. त्यानंतर ठिय्या आंदोलन करण्यात आले. या वेळी मार्गदर्शन करतांना बाबा कांबळे बोलत होते.

यावेळी टपरी, पथारी, हातगाडी पंचायतचे पिंपरी चिंचवड शहर अध्यक्ष रमेश शिंदे, सचिव प्रकाश यशवंते, घरकाम महिला सभा अध्यक्ष आशा कांबळे, मधुरा डांगे,मलिक शेख, ज्योती कांबळे, अरुण भोसले, अनिता डांगे, नारायण कुचलानी, विशाल साबळे, राजेश महिलामणी, कृष्णा शिंदे, पल्लवी दाखले, इसराइल बागवान, मनीषा गगने, कल्पना शिरसाठ, मंगेश मेहता, अजय वायदंडे, प्रकाश घोले, शिवाजी कुडूक आदी या वेळी उपस्थित होते.

### राज्यकर्ते केवळ निवडणुकीला वापरतात...

»बाबा कांबळे म्हणाले की, संघटनेने संघर्ष करून लढा देत टपरी, पथारी, हातगाडीधारकांसाठी संरक्षण देणारा कायदा करून घेतला आहे. या कायद्यामध्ये अनेक गोष्टींची तरतूद आहे. कारवाई दरम्यान साहित्य उचलून घेऊन जाण्याचा अधिकार अधिकाऱ्यांना नाही. त्याविरोधात पोलिसात गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया आहे. मात्र अधिकाऱ्यांनी कारवाई करून साहित्य घेऊन गेल्यानंतर त्या विरोधात संघर्षाची तयारी ठेवणे गरजेचे आहे. आपण तिकडे पाठ फिरविल्यास न्याय मिळणार नाही. त्यामुळे येणाऱ्या काळात चुकीच्या कारवाई विरोधात संघर्षाची तयारी ठेवावी असे आवाहन बाबा कांबळे यांनी केले. तसेच जे राज्यकर्ते आपला केवळ निवडणुकीला वापर करतात. त्यांना धडा शिकवू असा इशाराही कांबळे यांनी दिला.

# भारतीयांनी 'राष्ट्र प्रथम' ही भावना बाळगावी!

## »ले. जन. भारद्वाज : इंडस इन्स्टिट्यूटमध्ये फॉलन सोल्जर बॅटलचे अनावरण

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आयुष्यात कोणतेही कार्य करा, मात्र सर्वप्रथम देश अशी भावना मनात बाळगा. देशातील प्रत्येक नागरीकांनी स्वयंशिस्तीला सर्वाधिक प्राधान्य देणे गरजेचे आहे, असे मत लेफ्टनंट जनरल दिलीप भारद्वाज यांनी व्यक्त केले..**



वाकड येथील आयआयइबीएम संस्था संचलित इंडस बिझनेस स्कूलमध्ये विजय दिन साजरा करण्यात आला. यावेळी १९७१ च्या विजयी युद्धातील सैनिक परम विशिष्ट सेवा पदक विजेते लेफ्टनंट जनरल दिलीप भारद्वाज, कर्नल नियती नायक, कर्नल विनोद मारवाह, ब्रिगेडिअर दीपक बजाज, ब्रिगेडियर प्रमथेश रैना,कर्नल सुधीर भटनागर, ब्रिगेडिअर भवानीसिंग शेखावत, कर्नल गुरिंदरसिंग ग्रेवाल, डॉ.जयसिंग मारवाह उपस्थित होते.

यावेळी कॉलेजच्या प्रवेशद्वाराजवळ फॉलन सोल्जर बॅटल क्रॉस (शहिद जवानांचे प्रतीक) चे अनावरण करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आय.आय.ई.बी. एमच्या अधिष्ठाता डॉ. पूनम निकम,प्राचार्या प्रा.नम्रता जियानी, सह अधिष्ठाता डॉ. विशाल भोळे, कर्नल रवींद्र कुमार, बापू पवार सर्व शिक्षक आणि शिक्षिकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

### युद्धाच्या आठवणींना उजाळा...

» आयआयईबीएमचे अध्यक्ष कर्नल विनोद मारवाह म्हणाले की, हिंदुस्तानने १९७१ मध्ये पाकिस्तानसोबत केलेल्या युध्दात आम्ही विजय मिळवला. पाकिस्तानच्या ९३ हजार सैनिकांनी आत्मसमर्पण केले. तेव्हा बांग्लादेशी हा नवीन देश उदयास आला.या युध्दातील सर्व जवान एकत्रित येवून आम्ही विजय दिन साजरा करीत आहे. युद्धाच्या वेळी आम्ही अंदाजे १८/१९ वयाचे असेल. आजही आम्ही आमच्या दैनंदिन जीवनात राष्ट्रहित सर्वप्रथम मानतो.




# पीएच.डी. करून दिवे लागत नाहीत

**नागपूरमध्ये सध्या विधानसभेचे हिवाळी अधिवेशन सुरू आहे. त्यामध्ये अनेक मुद्यांवर चर्चा होत आहे. अशातच सारथी, बार्टी, महाज्योतसारख्या संस्थांच्या माध्यमातून समाजातील विविध स्तरातील विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त सुविधा कशा पुरवता येतील यावर विधान परिषदेत चर्चा झाली.**



काँग्रेसचे आमदार सतेज पाटील विधान परिषदेत म्हणाले, “सारथीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पीएच. डी. करण्यासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. परंतु केवळ २०० विद्यार्थ्यांनाच ती दिली जाईल, असा निर्णय सरकारकडून घेण्यात आला आहे. हा आकडा खूप कमी असून तो वाढवण्यात यावा अशी मागणी काँग्रेस आमदार सतेज पाटील यांनी केली. ते ऐकताच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पीएच.डी. करून ही पोरं काय दिवे लावणार आहेत, असे वक्तव्य केले. अजित पवारांच्या या धक्कादायक वक्तव्याचं सतेज पाटलांसह अनेकांना आश्चर्य वाटलं. विधान परिषदेतील या वक्तव्यामुळे अजित पवार समाजमाध्यमांवर ट्रोल होऊ लागले आहेत. पीएच. डी. करणारे विद्यार्थी अजित पवारांविरोधात नाराजी व्यक्त करत आहेत. तर काहींनी अजित पवारांच्या या वक्तव्याचा निषेध नोंदवला आहे. उपमुख्यमंत्री पदावरील व्यक्तिकडून तरी अशा बेताल वक्तव्याची अपेक्षा नसते. परंतु अलीकडे अनेक सत्ताधारी तसेच नेत्यांमध्ये अशी बेताल वक्तव्य करण्याची जणू स्पर्धा सुरू आहे की काय असे वाटते. कारण मागच्या वर्षी याच काळात उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी महापुरुषांनी भीक मागून शाळा महाविद्यालये सुरू केली असे वक्तव्य केले होते. विधानसभेमध्ये चंद्रकांत पाटील यांनी प्राध्यापक भरतीमध्ये एक एक जागा भरण्यासाठी किती पैसे द्यावे लागतात माहिती आहे ना असे म्हणून प्राध्यापक भरतीतील घोटाळाही मान्य केला होता. अशा बेताल वक्तव्याची यादी खूप मोठी आहे. त्यामधले अलीकडचे शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्या वक्तव्याचाही समावेश आहे. असो. आपला मुद्दा असा आहे की खरच पीएच.डी. करून आतापर्यंत खरोखरच काही दिवे लागले आहेत की नाही? पीएच. डी. संशोधनावर खर्च करणे ही देशासाठी नुकसानदायक गोष्ट आहे का, हा विचार आपल्याला करावा लागेल. देश स्वतंत्र झाल्यानंतर आधीच्या पुढाऱ्यांनी विज्ञान संशोधनाच्या संस्था काढल्यामुळे देशात कोणते दिवे लागणार आहेत, असाच विचार केला असता तर आज देशात इसरो आय. आय. टी. सारख्या मोठ्या संस्था उभ्या राहिल्या असत्या का? देश परमाणु आणि आण्विक ऊर्जेत स्वयंपूर्ण झाला असता का हा विचार करणे गरजेचे आहे. याच संशोधनांमधून विक्रम साराभाई, डॉ. अब्दुल कलाम, सत्येन्द्रनाथ बोस आणि असे बरेच मोठे, आपल्या कर्तुत्वातून आपल्या देशाचे नाव मोठे करणारे वैज्ञानिक तयार झाले, ते झाले असते का असे प्रश्न पडतात. आर्थिक तसेच विकासाच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या ‘ओईसीडी’ या संस्थेने २०२२ मध्ये जाहीर केलेल्या अहवालानुसार दरवर्षी सर्वाधिक पीएच.डी. उत्तीर्ण होणाऱ्यांच्या संख्येत अमेरिका, जर्मनी, इंग्लंडनंतर भारताचा क्रमांक लागतो. २०२२ या वर्षात भारतात २४ हजार विद्यार्थी पीएच. डी. झाले आहेत. एका वर्षात इतके पीएच.डी.धारक बाहेर पडत असतील, तर आतापर्यंत देशात लाखो संशोधक निर्माण झाले आहेत, हे मान्य करावे लागेल. अशा स्थितीत नवसंशोधनाच्या संदर्भातही जगात भारताचा वरचा क्रम लागायला हवा. मात्र ‘ग्लोबल इनोवेशन इंडेक्स’नुसार २०२३ साली नवसंशोधन क्षेत्रात भारताचा क्रमांक जगात ४० वा आहे. त्यामुळे पीएच.डी.धारकांमुळे देशातल्या कुठल्याही ज्ञानशाखेत कुठलीही भर घातली जात नसेल, तर अशा संशोधनाला अर्थ काय, या संशोधकांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचेही योगदान काय हे प्रश्न निर्माण होतात. कदाचित उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मनातही हीच भावना असेल. परंतु या भावनेतून लगेच पीएच. डी. करून काही दिवे लागणार नाहीत म्हणणे कितपत योग्य आहे? उलट इच्छित परिणाम येत नसतील तर संशोधनामध्ये अनुदान वाढवायला हवे. फंडिंग वाढवून स्वतः त्याकडे लक्ष द्यायला हवे. कारण संशोधनाला प्रतिष्ठा देण्याबाबत विकसित देशांच्या तुलनेत आपले फार उदासीन आहे.

## संपादकीय »

### पुढल्या हाका

***बेरोजगारी, कौशल्याचा आणि संधींचा अभाव, गरिबी या दुष्टचक्रात आजचा तरुण असल्याचे वास्तव संसदेतील ‘धूरहल्ल्या’तूनही एक प्रकारे अधोरेखित झाले..***

तुम्ही मला तुमच्या देशातल्या तरुणांच्या ओठांवरची गाणी सांगा, मी तुम्हाला तुमच्या देशाचं भविष्य सांगतो..’ असे ‘कुणी तरी’ म्हटले आहे. संसदेचे अधिवेशन सुरू असताना प्रेक्षक दालनातून उडी मारून संसदेच्या सभागृहात येणाऱ्या आणि ‘तानाशाही नही चलेगी’ अशा घोषणा देत तथाकथित ‘कलर बॉम्ब’ उडवणाऱ्या तरुणांच्या ओठांवरचे हे शब्द ऐकून हा ‘कुणी तरी’ आपल्या देशाचे भवितव्य सांगू जाईल तर ते नेमके काय असेल? त्याचे म्हणणे काय असेल ते असो, पण ही घटना गंभीर खरीच. लोकशाही देशाचे सर्वोच्च व्यासपीठ असलेल्या संसदेवर वीस वर्षांपूर्वी याच तारखेला म्हणजे १३ डिसेंबरला दहशतवादी हल्ला झाला होता, तेव्हा अवघ्या देशाचा थरकाप उडाला होता. एखाद्या हत्तीच्या गंडस्थळावर वार करण्याइतकाच तो हल्ला गंभीर होता. त्याबद्दल पुढे काय व्हायचे ते सोपस्कार झाले.

**महाराष्ट्र आणि मराठी भाषेवर एक फार मोठं संकट येऊ घातलं आहे. सध्याच्या झंझावाती राजकारणात महाराष्ट्र आणि मराठी भाषा यांचा निभाव लागायचा असेल तर फार मोठा संघर्ष करावा लागणार आहे. दुर्दैवाने असा संघर्ष करण्याची कुवत सध्या कोणत्याही राजकीय पक्षात किंवा नेत्यात दिसत नाही.**

# राज्याच्या अस्मितेवर आपण जागरूक आहोत का?

महाराष्ट्र आणि मराठी भाषा यांच्यावर अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. मुंबई हा राज्याच्या स्थापनेपासूनच एक वादग्रस्त विषय राहिलेला आहे. ‘मुंबई महाराष्ट्रापासून तोडू देणार नाही...’ अशी राणा भीमदेवी घोषणा काही राजकीय पक्ष आणि नेते त्यांच्या अस्तित्वासाठी करत असतात. पण आता वेळ अशी आलेली आहे की, मुंबई महाराष्ट्रापासून भौगोलिक आणि राजकीय दृष्टीने न तोडतासुध्दा महाराष्ट्रापासून अलग होऊ शकते. यासाठी येती मुंबई म.न.पा. आणि २०२४ ची महाराष्ट्र विधानसभा निवडणूक कसोटीची आणि अतिशय निर्णायक ठरणार आहेत. सध्याची महाराष्ट्रातील एकूण राजकीय परिस्थिती पाहता भाजपचं झंझावाती राजकारण प्रभावी ठरणार आणि दोन्ही ठिकाणी भाजपला निर्विवाद बहुमत मिळणार यात शंका नाही. हेच महाराष्ट्राच्या आणि मराठी भाषेच्या अस्तित्वासाठी घातक ठरणार आहे. आज महाराष्ट्रातील कोणत्याही राजकीय पक्ष किंवा




नेत्यामध्ये प्रादेशिक अस्मिता दिसून येत नाही. याचाच फायदा भाजपला मिळू शकतो. मुंबईचं मराठीकरण करायचं सोडून ते महाराष्ट्राचंच हिंदीकरण करतील. निर्विवाद बहुमत मिळाल्यास मतांसाठीची अगतिकता अर्थात लाचारी, आर्थिक उपकार आणि स्थानिक बहुसंख्य जनतेचा रेटा याचा परिणाम म्हणून येन केन प्रकारेण प्रथम मुंबई महापालिकेची दुसरी अधिकृत भाषा म्हणून हिंदी घुसवली जाईल. नजीकच्या भविष्यात याच कारणांमुळे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही हिंदीचा शिरकाव होणार. यामुळे मराठी माणूस आणि मराठी भाषा निष्प्रभ होऊन मुंबई आणि महानगर प्रदेश भौगोलिक किंवा राजकीय दृष्टीने न तोडता महाराष्ट्रापासून अलगदपणे अलग होऊ शकतात. दुर्दैव म्हणजे याला अनेक भाबड्या मराठी लोकांचाही विरोध नसेल. पण यामुळे महाराष्ट्राची प्रादेशिक ओळख, अस्मिता आणि महाराष्ट्र राज्याचे आणि मराठी भाषेचे स्वतंत्र अस्तित्वच धोक्यात येऊ शकते. सध्या संपूर्ण महाराष्ट्रात प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे हिंदीचा सार्वजनिक भाषा म्हणून वापरण्याचा शासनपातळीवरही प्रयत्न चालू असून सामान्य मराठी माणूस त्याला बळी पडत आहे. राज्य शासनाच्या अधिकृत जाहिरातीत ‘आजादी का अमृत महोत्सव’ तथा ‘प्रधानमंत्री’ असे हिंदी शब्द बेमालूमपणे घुसवले जातात. मंगलप्रभात लोढांसारखे महाराष्ट्र राज्याचे मंत्री त्यांच्या खात्याचा कारभार हिंदीतून अधिकृतपणे करत आहेत. मुंबईचे जिल्हाधिकारी शासकीय परिपत्रके सर्रास हिंदीतून वितरीत करतात. यांना विचारणारे कुणीच नाहीत ? का विचारायचं कारणच नाही ?

## || अभंगवाणी ||



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पालकमंत्र्यांनी पालिका आयुक्तांना सुनावले

## » कमिशनसाठी काम थांबल्याचा अधिकाऱ्यावर आरोप

। मुंबई । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**कोल्हापूर शहरातील रखडलेल्या विकास कामावरून शनिवारी पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी महापालिकेच्या आयुक्त के. मंजूलक्ष्मी, अतिरिक्त आयुक्त रविकांत अडसूळ, जल अभियंता नेत्रदीप सरनोबत आदी वरिष्ठ अधिकाऱ्यांची कडक शब्दात कान उघडणी केली. कोल्हापूर महापालिकेंच्या वतीने आयोजित कसबा बावड्यातील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाच्या लोकार्पण सोहळ्यातील कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी बोलताना हसन मुश्रीफ यांचा पारा चढला. कोल्हापूर महापालिकेच्या रखडलेल्या विकास कामाबद्दल तीव्र शब्दांमध्ये नापसंती व्यक्त केली.**



कोल्हापूर महापालिका अंतर्गत रस्ते खराब झाले असल्याने त्यासाठी शंभर कोटी रुपयांचा निधी आला आहे. ही कामे दिवाळी पूर्वी होणे अपेक्षित होते. मात्र अजूनही त्याला गती आलेली नाही. ही कामे अधिकाऱ्यांच्या कमिशन मुळे थांबली आहेत, असा थेट आरोप त्यांनी अधिकाऱ्यांवर केला. अतिरिक्त आयुक्त रविकांत अडसूळ यांचा नाम उल्लेख करीत त्यांनी कमिशनचा विषय काढला. तेव्हा अडसूळ हे दुसरीकडे पाहत होते. पण, त्यांचे लक्ष वेधून कमिशनमुळे काम थांबता कामा नये, अशी सक्त ताकीद मुश्रीफ यांनी दिली. शिवाय, महापालिकेचे कामे करायचे नसतील तर अडसूळ यांनी मूळच्या ग्राम विकास खात्याकडे जावे, असे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी सूचित केले. अडसूळ हे पूर्वी ग्रामविकास विभागात होते.

मीच त्यांना महापालिकेत आणले होते, अशी आठवण त्यांनी करून दिली. कोल्हापूर शहरातील रखडलेल्या विकास कामावरून शनिवारी पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी महापालिकेच्या आयुक्त के. मंजूलक्ष्मी, अतिरिक्त आयुक्त रविकांत अडसूळ, जल अभियंता नेत्रदीप सरनोबत आदी वरिष्ठ अधिकाऱ्यांची कडक शब्दात कान उघडणी केली. कोल्हापूर महापालिकेंच्या वतीने आयोजित कसबा बावड्यातील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाच्या लोकार्पण सोहळ्यातील कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी बोलताना हसन मुश्रीफ यांचा पारा चढला. कोल्हापूर महापालिकेच्या रखडलेल्या विकास कामाबद्दल तीव्र शब्दांमध्ये नापसंती व्यक्त केली. शिवाय, महापालिकेचे कामे करायचे नसतील तर अडसूळ यांनी मूळच्या ग्राम विकास खात्याकडे जावे, असे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी सूचित केले. अडसूळ हे पूर्वी ग्रामविकास विभागात होते.

मीच त्यांना महापालिकेत आणले होते, अशी आठवण त्यांनी करून दिली. कोल्हापूर शहरातील कचरा प्रकल्पाचे काम करण्याबाबत आयुक्त के.मंजू लक्ष्मी यांना हसन मुश्रीफ यांनी आठवण करून दिली होती. तरीही हे काम झाले नसल्याने मुश्रीफ चांगलेच संतापले. चार दिवसांमध्ये या कामाचे कार्यादेश द्यावेत अन्यथा रविकांत अडसूळ यांना बदला, अशा सूचना मुश्रीफ यांनी यावेळी केली. त्यांनी के. मंजू लक्ष्मी यांना आयुक्त म्हणून राहायचे की जिल्हाधिकारी अशी विचारणा केली. त्या सिंधुदुर्ग येथे पाच वर्षाचे जिल्हाधिकारी होत्या. आता त्यांना पुन्हा या पदाची संधी नाही, असेही त्यांनी नमूद केले.

### भ्रष्टाचार थांबणार का?

» पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी महापालिकेच्या आयुक्त के. मंजूलक्ष्मी, अतिरिक्त आयुक्त रविकांत अडसूळ, जल अभियंता नेत्रदीप सरनोबत आदी वरिष्ठ अधिकाऱ्यांची कडक शब्दात कान उघडणी केली. कोल्हापूर महापालिकेंच्या वतीने आयोजित कसबा बावड्यातील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाच्या लोकार्पण सोहळ्यातील कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी बोलताना हसन मुश्रीफ यांचा पारा चढला. कोल्हापूर महापालिकेच्या रखडलेल्या विकास कामाबद्दल तीव्र शब्दांमध्ये नापसंती व्यक्त केली. शिवाय, महापालिकेचे कामे करायचे नसतील तर अडसूळ यांनी मूळच्या ग्राम विकास खात्याकडे जावे, असे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी सूचित केले. अडसूळ हे पूर्वी ग्रामविकास विभागात होते. एकंदरीतच आज कोल्हापूर महापालिकेचा रखडलेला कारभार, त्यातील गैर व्यवहार यावर खुद्द पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनीच तीव्र भाषेमध्ये सुनावले आहे. विकास कामे रेंगाळणे बरोबर नाही. लोक टीका करतात. पालकमंत्र्यांच्या नावे आरोप होतात,असे ते म्हणाले. तथापि, यामुळे आता तरी कोल्हापूर महापालिकेतील कासवगतीच्या कामकाजामध्ये सुधारणा होणार का, आणि त्यातील भ्रष्टाचार थांबणार का ?असा प्रश्न उपस्थित झाला आहे.कोल्हापूर शहरातील रखडलेल्या विकास कामावरून शनिवारी पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी महापालिकेच्या आयुक्त के. मंजूलक्ष्मी, अतिरिक्त आयुक्त रविकांत अडसूळ, जल अभियंता नेत्रदीप सरनोबत आदी वरिष्ठ अधिकाऱ्यांची कडक शब्दात कान उघडणी केली.


# दिलेल्या आश्वासनांची पूर्तता केली नाहीतर

## » 17 डिसेंबरला मराठा समाजाच्या बैठकीचं आयोजन केलं

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठा समाजाचा सरसकट ओबीसीत समावेश करण्यासाठी नेते मनोज जरांगे-पाटील यांनी सरकारला २४ डिसेंबरची मुदत दिली होती. ही मुदत संपवण्यासाठी काही दिवसांचा कालावधी उरला आहे. जरांगे-पाटलांनी या बैठकीत आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यात येणार आहे. अशातच प्रहारचे आमदार बच्चू कडू यांनीही सरकारला इशारा दिला आहे.**







"सरकारनं जरांगे-पाटलांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता केली नाही, तर आम्हाला आंदोलनात सहभागी व्हावं लागेल," असं बच्चू कडूंनी म्हटलं आहे. ते प्रसारमाध्यमांशी संवाद साधत होते.

बच्चू कडू म्हणाले, "१७ डिसेंबरला जरांगे-पाटील नवीन आंदोलनाची घोषणा करणार आहेत. जरांगे-पाटलांना दिलेल्या आश्वासनांचा अहवाल सरकारनं दिला नाही. सरकारनं जरांगे-पाटलांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता केली पाहिजे. आश्वासनांची पूर्तता केली नाही तर आम्हाला जरांगे-पाटलांच्या आंदोलनात सहभागी व्हावं लागेल." दरम्यान, जरांगे-पाटलांनीही शुक्रवारी ( १५ डिसेंबर ) सरकारला इशारा दिला आहे.

"मराठा आरक्षणासाठी सरकारनं आतापर्यंत काय कार्यवाही केली? हे १७ डिसेंबरपर्यंत कळवावे.

### सरकारला 24 डिसेंबरची मुदत

» मराठा समाजाचा सरसकट ओबीसीत समावेश करण्यासाठी नेते मनोज जरांगे-पाटील यांनी सरकारला २४ डिसेंबरची मुदत दिली होती. ही मुदत संपवण्यासाठी काही दिवसांचा कालावधी उरला आहे. जरांगे-पाटलांनी या बैठकीत आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यात येणार आहे. अशातच प्रहारचे आमदार बच्चू कडू यांनीही सरकारला इशारा दिला आहे. तुम्ही मराठ्यांची फसवणूक करत असल्याचा संशय आम्हाला येतोय. १७ डिसेंबरला आम्ही आंदोलनाचा निर्णय घेतला की तुमचा आणि आमचा विषय संपला," असं जरांगे-पाटलांनी सरकारला ठणकावलं आहे. "सरकारनं जरांगे-पाटलांना दिलेल्या आश्वासनांनी पूर्तता केली नाही, तर आम्हाला आंदोलनात सहभागी व्हावं लागेल," असं बच्चू कडूंनी म्हटलं आहे.

# संसदेत विरोधकांची आक्रमक भूमिका!

## » खासदारांच्या निलंबनानंतर सभागृहांमध्ये गोंधळ

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**संसदेच्या सभागृहांमध्ये येऊन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा निवेदन देत नाहीत, तोपर्यंत हिवाळी अधिवेशनाचे कामकाज चालू देणार नाही', अशी आक्रमक भूमिका विरोधकांनी घेतली आहे. विधानसभा निवडणुकांमधील पराभवामुळे मरगळलेले विरोधक शुक्रवारी पहिल्यांदाच संसदेमध्ये आक्रमक झालेले दिसले.**




'इंडिया'च्या असहकाराची भूमिका राज्यसभेच्या सभापतींना विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे व इतर गटनेत्यांनी कळवल्याचे काँग्रेसचे माध्यम विभागप्रमुख जयराम रमेश यांनी सांगितले. संसदेतील सुरक्षाभंगाच्या घटनेवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी निवेदन द्यावे अन्यथा त्यांनी राजीनामा द्यावा, ही मागणी 'इंडिया'तील घटक पक्षाच्या खासदारांनी शुक्रवारीही तीव्र केली. विरोधी खासदारांच्या निलंबनामुळे संतापलेल्या विरोधकांनी लोकसभेत 'लोकशाही वाचवा, फॅसिझम रोखा' असा संदेश लिहिलेले फलक आणले होते. नव्या संसदेमध्ये खासदारांनी सभागृहात फलक न आणण्याचा निर्णय घेण्यात आल्याचा दावा केंद्रीय संसदीय कामकामंत्री प्रल्हाद जोशी यांनी केला होता. या निर्णयाच्या आधारे खासदारांना निलंबित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, विरोधी सदस्यांनी संसदेच्या मुख्यद्वाराच्या पायऱ्यांवरही फलक घेऊन निषेध नोंदवला. त्यात डेरेक ओब्रायन यांच्यासह इतर निलंबित खासदारही सहभागी झाले होते.

सकाळच्या सत्रामध्ये दोन्ही सभागृहाचे कामकाज सुरू होताच विरोधी खासदारांनी शहांविरोधात घोषणाबाजी केल्यामुळे काही मिनिटांमध्ये सभागृहांचे कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले.

दुपारी तीन वाजता लोकसभेचे कामकाज सुरू होण्यापूर्वी विरोधी खासदार गळ्यात फलक घालून सभागृहात उभे राहिले होते. मात्र, त्यांना घोषणाबाजी करण्याची संधीही न देता पीठासीन अधिकाऱ्यांनी लोकसभेचे कामकाज सोमवारपर्यंत तहकूब केले. संसदेचं हिवाळी अधिवेशन सुरू असताना १३ डिसेंबर रोजी लोकसभेत गदारोळ झाला. प्रेक्षक गॅलरीतून दोघांनी लोकसभेत उडी मारून कॅनमधील पिवळा धूर सोडला. यामुळे काहीकाळ कामकाज ठप्प झालं होतं. तर, खासदारांनाही क्षणभर काय होतंय हे कळलं नाही. याप्रकरणी सातत्याने नवनवे खुलासे समोर येत आहेत.

आरोपींची दिल्ली पोलिसांकडून चौकशी सुरू असून त्यांनी धक्कादायक माहिती दिली आहे. इंडिया टुडेने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे. या प्रकरणातील ललित झा याला काल (१५ डिसेंबर) पटियाला कोर्टात हजर करण्यात आलं होतं. यावेळी पोलिसांनी धक्कादायक माहिती दिली. या कटाचा मीच मुख्य सुत्रधार असल्याचं ललित झा याने पोलिसांच्या चौकशीत मान्य केल्याचं पोलिसांनी कोर्टात सांगितलं. तसंच, त्याला सात दिवसांची पोलीस कोठडीही सुनावण्यात आली आहे.

या घटनेमागील कथित सूत्रधार ललित झा आणि त्याच्या सहआरोपींना त्यांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी सरकारला भाग पाडण्यासाठी देशात अराजकता निर्माण करायची होती, असं दिल्ली पोलिसांनी न्यायालयाकडे त्यांच्या रिमांड याचिकेत नमूद केले. हल्ल्यामागचा खरा हेतू, त्यांचे शत्रू देशांशी आणि दहशतवादी संघटनांशी संबंध आहेत का, याचा तपास पोलिसांकडून करण्यात येत असल्याची माहिती कोर्टात देण्यात आली. दरम्यान, "आम्ही संसदेच्या आत आणि संसद भवनाबाहेर गुन्हेगारीचे दृश्य पुन्हा तयार करण्यासाठी परवानगी घेण्यासाठी संसदेकडे जाण्याचा विचार करत आहोत. गुरुवारी अटक करण्यात आलेल्या ललित झा याने चौकशीदरम्यान खुलासा केला की, त्याने आपला फोन दिल्ली-जयपूर सीमेजवळ फेकून दिला आणि इतर आरोपींचे फोन नष्ट केले", एका अधिकाऱ्याने पीटीआय या वृत्तसंस्थेला सांगितले.

### या कटाचा मीच सूत्रधार

» संसदेच्या आवारात आणि लोकसभेच्या सभागृहात धूर पसरवत गोंधळ घालणाऱ्या चार आरोपींना पोलिसांनी अटक केली. तसंच हे आरोपी ज्या दाम्पत्याकडे राहिले होते त्यांनाही पोलिसांनी अटक केली. यानंतर या कटाचा मास्टरमाईंड ललित झा हा फरार होता. त्याने पोलिसांसमोर गुरुवारी उशिरा आत्मसमर्पण केलं. त्यानंतर आज ललितला पटियाला हाऊस कोर्टासमोर हजर करण्यात आलं होतं. कोर्टाने त्याला सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. त्याने स्वतःच आपण या कटाचा सूत्रधार असल्याचं स्पष्ट केलं आहे.

# काँग्रेसची क्राऊड फंडिंग मोहीम!

## » महात्मा गांधींच्या 'या' मोहिमेतून घेतली प्रेरणा

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**२०२४ च्या लोकसभा निवडणुकीआधी काँग्रेसने पक्षनिधीसाठी तयारीला सुरुवात केली आहे. यासाठी पार्टी क्राऊड फंडिंग मोहीम सुरू करण्यात येणार आहे. डोनेट फॉर देश असं या मोहिमेचं नाव असून १८ डिसेंबरपासून याची सुरुवात होणार आहे. पक्षातील सर्व पदाधिकारी आणि सदस्यांनी या मोहिमेसाठी कमीत कमी १३८० रुपयांचं योगदान देण्याचं आवाहन केलं आहे.**



काँग्रेसचे खासदार केसी वेणुगोपाल यांनी शनिवारी पत्रकार परिषद आयोजित करून या मोहिमेविषयी माहिती दिली. वेणुगोपाल म्हणाले, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला आपल्या ऑनलाईन क्राऊडफंडिंग अभियान डोनेट फॉर देश मोहिमेचे अनावरण करताना अभिमान वाटत आहे. ही मोहीम १९२०-२१ साली महात्मा गांधीच्या ऐतिहासिक टिळक स्वराज्य फंड मोहिमेपासून प्रेरित होऊन सुरू करण्यात येत आहे. श्रेष्ठ भारत बनवण्यासाठी पक्ष सशक्त बनवणे हा यामागचा उद्देश आहे. या अभिनायाची अधिकृत सुरुवात पक्षाचे अध्यक्ष १८ डिसेंबरपासून दिल्लीतून करणार आहेत. वेणुगोपाल पुढे म्हणाले, "आम्ही आमच्या राज्यस्तरीय पदाधिकारी, निवडून आलेले लोकप्रतिनिधी, डीसीसी अध्यक्ष, पीसीसी अध्यक्ष आणि AICC च्या पदाधिकाऱ्यांना प्रत्येकी कमीत कमी १३८० रुपयांचं योगदान देण्याचे आवाहन करतो. द असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स (ADR) ने या वर्षी सप्टेंबरमध्ये एक अहवाल प्रसिद्ध केला होता. त्यानुसार देशातील ८ राष्ट्रीय पक्षांच्या घोषित संपत्तीत एका वर्षात १५३१ कोटी रुपयांची वाढ झाली आहे. २०२०-२१ मध्ये या पक्षांची मालमत्ता ७,२९७.६२ कोटी रुपये होती. २०२१-२२ मध्ये त्यांची संपत्ती ८,८२९.१६ कोटी रुपये झाली. भाजप, काँग्रेस, राष्ट्रीय काँग्रेस पक्ष (NCP), बहुजन समाज पक्ष (BSP), भारतीय कम्युनिस्ट पार्टी (CPI), CPI (MAOIST), तृणमूल काँग्रेस आणि नॅशनल पीपल्स पार्टी (NPEP) या राष्ट्रीय पक्षांची ही घोषित संपत्ती आहे.

# केरळमध्ये आढळला करोनाचा नवा उपप्रकार

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

देशात करोनाने पुन्हा एकदा डोकं वर काढलं आहे. कोविडचा सबव्हेरियंट असलेल्या BA.2.86 च्या जातीतील JN.1 चा विषाणू केरळच्या काही भागांमध्ये आढळून आला आहे. त्यामुळे या विषाणूच्या संसर्गाची चिंता निर्माण झाली आहे. तसंच, हा विषाणू वेगाने पसरणारा असल्याचीही माहिती समोर आली आहे. THE INDIA SARS-COV-2 GENOMICS CONSORTIUM या प्रयोगशाळेने केरळमध्ये हा विषाणू शोधला आहे. INSACOG चे अध्यक्ष एन. के. अरोरा म्हणाले, हा विषाणू नोव्हेंबरमध्ये आढळला होता. हा विषाणू BA.2.86 चा उपप्रकार आहे. तसंच, JN.1 विषाणूचे काही बाधित रुग्णही केरळमध्ये सापडले आहेत. हा विषाणू वेगाने पसरू नये याकरता उपाययोजना आखण्यात आल्याने आतापर्यंत रुग्णालयात दाखल किंवा गंभीर आजारांची नोंद झाले नसल्याचं या संस्थेने नमूद केलं.

नॅशनल इंडियन मेडिकल असोसिएशन कोविड टास्क फोर्सचे सह अध्यक्ष राजीव जयदेवन यांनी दिलेल्या माहितीनुसार, सात महिन्यांच्या अंतरानंतर भारतात पुन्हा एकदा करोनाचे रुग्ण वाढत आहेत. केरळमध्ये करोनाबाधित रुग्ण सापडत आहेत. परंतु, पूर्वीसारखी तीव्रता आताच्या प्रकरणांमध्ये नाही. दरम्यान केरळमध्ये आढळून आलेल्या JN.1 विषाणू जलद पसरू शकतो आणि यामुळे रोग प्रतिकारशक्तीही कमी होऊ शकते.

# इंडियन पोलीस फोर्स'चा टीझर आऊट!

'इंडियन पोलीस फोर्स'ची (INDIAN POLICE FORCE) घोषणा झाल्यापासून हा सिनेमा चर्चेत आहे. रोहित शेट्टीच्या (ROHIT SHETTY) या सीरिजचा टीझर आऊट झाला आहे. या टीझरमध्ये बॉलिवूड अभिनेता सिद्धार्थ मल्होत्राचा (SIDHARTH MALHOTRA) वर्दीमध्ये ॲक्शन मोड पाहायला मिळाला आहे. सिद्धार्थ मल्होत्राच्या 'इंडियन पोलीस फोर्स' सीरिजची चाहत्यांना उत्सुकता आहे. सीरिजमधील कलाकारांचे लूक आऊट झाल्यानंतर प्रेक्षक टीझरची प्रतीक्षा करत होते. आता टीझर आऊट झाला असून प्रेक्षकांची सिनेमाबाबतची उत्सुकता आणखी वाढली आहे. 'इंडियन पोलीस फोर्स' या सिनेमात सिद्धार्थ मल्होत्रा (SIDHARTH MALHOTRA), शिल्पा शेट्टी (SHILPA SHETTY) आणि विवेक ओबेरॉय (VIVEK OBEROI) मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. 'इंडियन पोलीस फोर्स'च्या टीझरमध्ये सिद्धार्थ मल्होत्रा, शिल्पा शेट्टी आणि विवेक ओबेरॉय पोलिसांच्या भूमिकेत दिसणार आहेत. देशाचं संरक्षण करताना सिद्धार्थ, शिल्पा आणि विवेक पाहायला मिळणार आहेत. एका शहरात बॉम्ब स्फोट होतो. या बॉम्ब स्फोटमध्ये अनेकांचा जीव जातो. बॉम्ब स्फोटानंतर दहशतवाद्यांचा बदला घेताना सिद्धार्थ दिसणार आहे. अभिनेता सिद्धार्थ मल्होत्राने 'इंडियन पोलीस फोर्स'चा टीझर सोशल मीडियावर शेअर केला आहे. टीझर शेअर करत त्याने लिहिलं आहे,"इंडियन पोलीस फोर्स' हा माझा पहिला ॲक्शनपट आहे. या सीरिजची मला उत्सुकता आहे. रोहित शेट्टीसोबत काम करताना मजा आली. ही सीरिज 19 जानेवारी 2023 रोजी ॲमेझॉन प्राईम व्हिडीओवर पाहू शकतात". 'इंडियन पोलीस फोर्स' ही सात भागांची सीरिज आहे. रोहित शेट्टी (ROHIT SHETTY) या सीरिजच्या दिग्दर्शनाची धुरा सांभाळली आहे. या सीरिजमध्ये सिद्धार्थ मल्होत्रा पहिल्यांदाच कधी न साकारलेली पोलीसाची भूमिका साकारणार आहे. या सीरिजमध्ये शिल्पा शेट्टी, विवेक ओबेरॉय, श्वेता तिवारी, निकितिन धीर, ऋतुराज सिंह आणि ललित परिमू हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत.

# अल्लू अर्जुनने नाकारली तंबाखूची जाहिरात!



दाक्षिणात्य सुपरस्टार अल्लू अर्जुन (ALLU ARJUN) सध्या त्याच्या आगामी 'पुष्पा 2' (PUSHPA 2) या सिनेमामुळे चर्चेत आहे. या सिनेमाच्या शूटिंगमध्ये सध्या तो व्यस्त आहे. अल्लू हा दाक्षिणात्य मनोरंजनसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता असून त्याचा मोठा चाहतावर्ग आहे. अभिनयाव्यतिरिक्त त्याने आपल्या कृत्याने पुन्हा एकदा प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. 'पुष्पा' (PUSHPA) फेम अल्लू अर्जुनने दारू आणि तंबाखूची जाहिरात करण्यास नकार दिला आहे. कोट्यवधी रुपयांची जाहिरात त्याने नाकारली आहे. अल्लू अर्जुनला एका दारूच्या आणि तंबाखूच्या कंपनीने एका जाहिरातीसाठी विचारणा केली होती. या जाहिरातीसाठी अल्लू अर्जुनला 10 कोटी रुपये मिळणार होते. पण अल्लू अर्जुनला कोणताही वाईट संदेश द्यायचा नव्हता. त्यामुळे त्याने ही जाहिरात करण्यास स्पष्ट नकार दिला आहे. अल्लू अर्जुनचा 'पुष्पा द राइज' (PUSHPA THE RISE) हा सिनेमा 2021 मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. बॉक्स ऑफिसवर हा सिनेमा सुपरहिट ठरला. या सिनेमातील अभिनयासाठी अल्लू अर्जुनला राष्ट्रीय पुरस्कारदेखील मिळाल. आता 'पुष्पा 2' या सिनेमात अल्लू अर्जुनचा आणखी धमाकेदार अंदाज पाहायला मिळणार आहे. काही दिवसांपूर्वी 'पुष्पा 2'मधील अल्लू अर्जुनचं पोस्टर आऊट झालं. चाहत्यांना आता रश्मिका मंदानाच्या (RASHMIKA MANDANNA) पोस्टरची प्रतीक्षा आहे. सिनेमागृहात धमाका केल्यानंतर हा सिनेमा ओटीटीवर रिलीज होणार आहे. दाक्षिणात्य अभिनेत्री सई पल्लवी 'पुष्पा 2' या सिनेमात झळकणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसेच बॉलिवूड अभिनेताही या सिनेमात दिसून येईल. अद्याप यासंदर्भात निर्मात्यांनी काहीही घोषणा केलेली नाही.

## ॲनिमल पार करणार 500 कोटींचा टप्पा!

बॉलिवूड अभिनेता रणबीर कपूर आणि रश्मिका मंदाना यांचा 'ॲनिमल' हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर धमाकेदार कामगिरी करत आहे. रिलीजच्या पहिल्या दिवसापासून आजही या सिनेमाची क्रेझ कायम आहे. सिनेमागृहात या सिनेमाला 15 दिवस पूर्ण झाले आहेत. सॅकनिल्कच्या रिपोर्टनुसार,'ॲनिमल' या सिनेमाने रिलीजच्या पहिल्या दिवशी 63.8 कोटींची कमाई केली आहे. दुसऱ्या दिवशी 66.27 कोटी, तिसऱ्या दिवशी 71.46 कोटी, चौथ्या दिवशी 43.96 कोटी, पाचव्या दिवशीतव्या दिवशी 24.23 कोटी, आठव्या दिवशी 22.95 कोटी, नवव्या दिवशी 34.74 कोटी, दहाव्या दिवशी 36 कोटी, अकराव्या दिवशी 13.85 कोटी, बाराव्या दिवशी 12.72 कोटी, तेराव्या दिवशी 10.25 कोटी, चौदाव्या दिवशी 8.75 कोटी आणि पंधराव्या दिवशी 7.50 कोटींची कमाई केली आहे.

## वैष्णवीनं केले गंभीर आरोप



अभिनेत्री वैष्णवी धनराज ही सध्या तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. वैष्णवी धनराजनं अनेक हिट टीव्ही मालिकांमध्ये काम केलं आहे. सीआयडी आणि तेरे इश्क में घायाल यांसारख्या मालिकांमध्ये तिनं महत्वाची भूमिका साकारली आहे. वैष्णवीनं नुकताच एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओच्या माध्यमातून वैष्णवीनं तिच्या कुटुंबावर काही गंभीर आरोप केले आहेत. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये वैष्णवीने तिच्या चाहत्यांना सांगताना दिसत आहे की, 'हाय, मी वैष्णवी धनराज आहे. मला आत्ता खरोखर मदतीची गरज आहे. मी काशिमीरा पोलीस ठाण्यात आहे, माझ्या कुटुंबियांनी मला शिवीगाळ आणि मारहाण केली. मला मीडिया, न्यूज चॅनेलमधील सर्वांची मदत हवी आहे. कृपया या आणि मला मदत करा'.वैष्णवीच्या या व्हिडीओमध्ये तिच्या चेहऱ्यावर आणि शरीरावर जखमांच्या खुणा दिसत आहेत. त्याच्या ओठावर जखम होती आणि उजव्या हाताच्या मनगटावर जखम दिसत आहे. आजतकला दिलेल्या मुलाखतीमध्ये वैष्णवीनं सांगितलं की, "माझा भाऊ, वहिनी आणि माझी आई गेल्या दहा वर्षांपासून मला त्रास देत आहेत. त्यांनी मला मारहाण करण्याची ही पहिलीच वेळ नाही, असे सातत्याने घडत आले आहे. त्यांना माझे आयुष्य नियंत्रित करायचे आहे, मी कुठे जात आहे, मी कोणाशी बोलत आहे, ते त्यांना जाणून घ्यायचे आहे. मला टॉर्चर कारण्याचे कारण मेरी रोड येथील प्रॉपर्टी आहे. ती त्यांना माझ्याकडून हिसकावून घ्यायची आहे.

# ॲडव्हान्स बुकिंगमध्ये प्रभासच्या 'सालार'चा धमाका

दाक्षिणात्य सुपरस्टार प्रभासचा (PRABHAS) 'सालार' (SALAAR) हा सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या सिनेमाची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत. या सिनेमासाठी प्रत्येकाने तगडं मानधन घेतलं आहे. या सिनेमात दाक्षिणात्य सुपरस्टार प्रभास (PRABHAS), श्रुती हासन (SHRUTI HAASAN), पृथ्वीराज (PRITHVIRAJ), सुकुमारन (SUKUMARAN) आणि जगपती बाबू महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. प्रशांत नील (PRASHANTH NEEL) यांनी या सिनेमाच्या दिग्दर्शनाची धुरा सांभाळली आहे.'सालार' या सिनेमाची निर्मिती 400 कोटींच्या बजेटमध्ये करण्यात आली आहे. या सिनेमासाठी प्रभासने 100 कोटी रुपयांचं मानधन घेतलं आहे. तसेच सिनेमाच्या यशातले 10 टक्केदेखील तो घेणार आहे. 'सालार'नंतर प्रभास दीपिका पादुकोण, कमल हसन



आणि अमिताभ बच्चन यांच्या 'कल्कि 2898 एडी' या सिनेमात झळकणार आहे. हा बिग बजेट पॅन इंडिया सिनेमा आहे. 'सालार' या सिनेमातील पृथ्वीराज सुकुमारनची भूमिका छोटी आहे. या भूमिकेसाठी पृथ्वीराजने चार कोटी रुपये चार्ज केले आहेत. या सिनेमात अभिनेत्री श्रुती हासन प्रभाससोबत स्क्रीन शेअर करताना दिसणार आहे. या सिनेमासाठी तिला 8 कोटी रुपयांचं मानधन घेतलं आहे. सिनेमात प्रभास, पृथ्वीराज आणि श्रुतीसह जगपती बाबू महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. जगपती बाबूने या सिनेमासाठी चार कोटी रुपये आकारले आहेत. 'सालार' या सिनेमाच्या दिग्दर्शनाची धुरा प्रशांत नीलने (PRASHANTH NEEL) सांभाळली आहे. प्रशांत नील यांनी याआधी 'केजीएफ', 'केजीएफ 2'च्या माध्यमातून बॉक्स ऑफिसवर राज्य केलं आहे. 'सालार' या सिनेमासाठी प्रशांत नील यांनी चांगलच मानधन घेतलं आहे. तब्बल 50 कोटी रुपये त्यांनी चार्ज केले आहेत. 'सालार' या सिनेमाच्या ॲडव्हान्स बुकिंगला आता सुरुवात झाली आहे. आतापर्यंत या सिनेमाचे 22 हजार 117 तिकिट विकले गेले आहेत.

# एबी डिव्हिलियर्सचा मोठा खुलासा!

## चहल बनला क्रिकेटमधून निवृत्ती होण्याचे कारण

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**दक्षिण आफ्रिकेचा बलाढ्य फलंदाज एबी डिव्हिलियर्सच्या नावाला परिचयाची गरज नाही. स्टेडियमच्या कोणत्याही कोपऱ्यात शॉट्स खेळण्याच्या क्षमतेमुळे त्याला '३६० डिग्री प्लेयर' असे नाव देण्यात आले. क्रिकेटच्या तिन्ही फॉरमॅटमध्ये दक्षिण आफ्रिकेसाठी अनेक अतुलनीय खेळी खेळणारा डिव्हिलियर्स भारतात खूप लोकप्रिय आहे. याचे कारण म्हणजे तो बऱ्याच दिवसांपासून आयपीएलमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून खेळत होता. त्याचे भारतीय संघ आणि विराट कोहलीसह अनेक खेळाडूंशी खास नाते आहे. आता या खेळाडूने आपल्या निवृत्तीबद्दल मोठा खुलासा केला आहे.**




सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्ती घेतलेल्या डिव्हिलियर्सने अलीकडेच त्याच्या यूट्यूब चॅनलवरील शोमध्ये भारतीय फिरकी गोलंदाज युझवेंद्र चहलच्या गोलंदाजी कौशल्याचे कौतुक केले. युजी चहलबद्दल तो गमतीने म्हणाला की, हा तो गोलंदाज आहे, जो त्याच्या क्रिकेटमधून निवृत्ती होण्याचे कारण बनला. आरसीबीचा त्याचा माजी सहकारी चहलबाबत तो म्हणाला की, २०१८ मध्ये जेव्हा भारतीय संघ दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावर गेला होता, तेव्हा चहलने त्याच्यावर वर्चस्व मिळवले होते. त्याचबरोबर या चतुर गोलंदाजांने डिव्हिलियर्सला आंतरराष्ट्रीय कारकिर्दीला अलविदा म्हणण्याची प्रेरणा मिळाली होती. सेंच्युरियनमधील एका खास सामन्याचा उल्लेख करताना डिव्हिलियर्स म्हणाला, 'मी सेंच्युरियनमधील माझ्या घरच्या मैदानावर खेळत होतो. मला चांगले आठवते की तिथे खूप उष्णता होती आणि ३० धावांवर फलंदाजी करताना मी खूप थकलो होतो. मला वाटले की मी सहज चौकार मारु शकेल, पण चहल खूप हुशार आहे, हे आपल्या सर्वांना माहीत आहे. तो एक बुद्धिबळपटू आहे. त्याला माहित होते की, मी काय करण्याचा प्रयत्न करत आहे आणि त्याने मला एका अद्भुत चेंडूने फसवले. त्यावेळी उडालेल्या बेल्सचा आवाज मला अजूनही आठवतो. त्यामुळे त्यासाठी युजीचे खूप खूप आभार. माझ्या निवृत्तीचे खरे कारण तूच होतास आता मी तुझा 'बनी' (खास विकेट) आहे.' डिव्हिलियर्सच्या म्हणण्यानुसार, भारतीय संघाच्या दौऱ्यापूर्वी चहलने त्याला सांगितले होते की, हा त्याचा पहिला दक्षिण आफ्रिकेचा दौरा आहे. पण या मालिकेत त्याने कुलदीप यादवसह दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजी लाइनअपला अडचणीत आणले. त्याचबरोबर टीम इंडियाने वनडे मालिकेतील आपले वर्चस्व कायम राखले आणि ५-१ अशा फरकाने जिंकली. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावर गेलेल्या संघांच्या लक्षात आले की, तिथल्या खेळपट्टींवर फिरकी गोलंदाजांना हाताळणे कठीण आहे. डिव्हिलियर्सने आयपीएलच्या १८४ सामन्यांमध्ये ३९.७०च्या सरासरीने ५१६२ धावा केल्या, ज्यात तीन शतके आणि ४० अर्धशतकांचा समावेश आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये त्याने ११६ कसोटी, २२८ वनडे आणि ७८ टी-२० सामने खेळले. त्याने कसोटीत ५०.६६ च्या सरासरीने ८७६५ धावा, वनडेमध्ये ५३.५० च्या सरासरीने ९५७७ धावा आणि टी-२० मध्ये २६.१२च्या सरासरीने १६७२ धावा केल्या आहेत. सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्ती घेतलेल्या डिव्हिलियर्सने अलीकडेच त्याच्या यूट्यूब चॅनलवरील शोमध्ये भारतीय फिरकी गोलंदाज युझवेंद्र चहलच्या गोलंदाजी कौशल्याचे कौतुक केले. युजी चहलबद्दल तो गमतीने म्हणाला की, हा तो गोलंदाज आहे, जो त्याच्या क्रिकेटमधून निवृत्ती होण्याचे कारण बनला. आरसीबीचा त्याचा माजी सहकारी चहलबाबत तो म्हणाला की, २०१८ मध्ये जेव्हा भारतीय संघ दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावर गेला होता, तेव्हा चहलने त्याच्यावर वर्चस्व मिळवले होते. त्याचबरोबर या चतुर गोलंदाजांने डिव्हिलियर्सला आंतरराष्ट्रीय कारकिर्दीला अलविदा म्हणण्याची प्रेरणा मिळाली होती. सेंच्युरियनमधील एका खास सामन्याचा उल्लेख करताना डिव्हिलियर्स म्हणाला, 'मी सेंच्युरियनमधील माझ्या घरच्या मैदानावर खेळत होतो. मला चांगले आठवते की तिथे खूप उष्णता होती आणि ३० धावांवर फलंदाजी करताना मी खूप थकलो होतो. मला वाटले की मी सहज चौकार मारु शकेल, पण चहल खूप हुशार आहे, हे आपल्या सर्वांना माहीत आहे. तो एक बुद्धिबळपटू आहे. त्याला माहित होते की, मी काय करण्याचा प्रयत्न करत आहे आणि त्याने मला एका अद्भुत चेंडूने फसवले

### एबी डिव्हिलियर्सची कारकीर्द

दक्षिण आफ्रिकेचा बलाढ्य फलंदाज एबी डिव्हिलियर्सच्या नावाला परिचयाची गरज नाही. डिव्हिलियर्सने आयपीएलच्या १८४ सामन्यांमध्ये ३९.७०च्या सरासरीने ५१६२ धावा केल्या, ज्यात तीन शतके आणि ४० अर्धशतकांचा समावेश आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये त्याने ११६ कसोटी, २२८ वनडे आणि ७८ टी-२० सामने खेळले. त्याने कसोटीत ५०.६६ च्या सरासरीने ८७६५ धावा, वनडेमध्ये ५३.५० च्या सरासरीने ९५७७ धावा आणि टी-२० मध्ये २६.१२च्या सरासरीने १६७२ धावा केल्या आहेत.

# पंड्याकडे कर्णधारपद सोपवल्यानंतर चाहते संतापले!

## मुंबई इंडियन्सच्या जर्सीलाच लावली आग; हिटमॅनच बेस्ट

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुंबई इंडियन्सने मोठा निर्णय घेतला असून, त्यांनी रोहित शर्माला हटवून आगामी हंगामासाठी मुंबई इंडियन्सची कमान हार्दिक पंड्याकडे सोपवली आहे. मुंबईने आज पंड्याला कर्णधार म्हणून नियुक्त केले. पाच वेळच्या आयपीएल विजेत्या रोहित शर्माकडून कर्णधारपद काढून घेतले. मुंबईचे कर्णधारपद हार्दिक पंड्याला दिले गेल्याची माहिती सोशल मीडियावर देण्यात आली.**



हार्दिक पंड्याला मुंबईने कर्णधारपद देताच सोशल मीडियावर प्रतिक्रियांचा पाऊस पडलाय. कुणी या निर्णयाचे स्वागत केलेय; तर काहींनी टीका केली आहे. हार्दिक पंड्या मुंबईच्या ताफ्यात पुन्हा सामील झाल्यानंतर कर्णधार होईल, असा अंदाज बांधला जात होता. अखेर यावर शिक्कामोर्तब झाले. मात्र, रोहित शर्माच्या जागी हार्दिककडे कर्णधारपद सोपवण्याचा मुंबई इंडियन्सचा निर्णय चाहत्यांना फारसा आवडला नाही. त्यामुळे काही संतप्त फॅन्सनी चक्क मुंबई इंडियन्सची जर्सीच जाळली आहे. याचा व्हिडीओही सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. रोहित शर्माला कर्णधारपदावरून हटवल्याबद्दल चाहत्यांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी असल्याचे सोशल मीडियावरील चाहत्यांच्या प्रतिक्रियांवरून स्पष्ट होते. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या या व्हिडीओमध्ये एका चाहत्याने मुंबई इंडियन्सची जर्सी पेटवल्याचे पाहायला मिळत आहे.आणखी एका चाहत्याने मुंबई इंडियन्सची कॅप जाळली. त्याचबरोबर मुंबई इंडियन्सला फॉलोअर्सचाही फटका बसला आहे. रोहित शर्माला कर्णधारपदावरून हटवल्यापासून चाहते सोशल मीडियावर मुंबई इंडियन्सला अनफॉलो करीत आहेत. मुंबई इंडियन्सचे इन्स्टाग्रामवर दोन लाखांहून अधिक फॉलोअर्स कमी झाले आहेत; तर एक्सवर चार लाखांहून अधिक लोकांनी अनफॉलो केले आहे. या व्हिडीओमध्ये तुम्ही पाहू शकता, चाहत्यांनी चक्क मुंबई इंडियन्सची जर्सी पेटवल्याचे पाहायला मिळत आहे. एका झाडाला ही जर्सी लावून फॅन्सनी ती पेटवली आहे. यातून मुंबई इंडियन्सच्या फॅन्सची नाराजी पाहायला मिळत आहे.

### यापुढे मुंबई इंडियन्सला सपोर्ट नाही

हार्दिकने गेल्या दोन हंगामांत गुजरातचे नेतृत्व केले होते आणि त्याच्या नेतृत्वाखाली संघ दोनदा अंतिम फेरी गाठण्यात आणि एकदा विजेतेपद पटकावण्यात यशस्वी ठरला होता. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली मुंबई इंडियन्सने पाच वेळा विजेतेपद पटकावले. याआधी मुंबईसाठी इतर कोणत्याही खेळाडूने अशी कामगिरी केली नव्हती.

MahaENews
The fight for truth... the right to democracy!
www.mahaenews.com | SUNDAY, 17th DECEMBER 2023 | Digital Edition | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# PCMC initiates steps to set up burn ward at civic hospital

## PCMC commissioner, Shekhar Singh held a meeting

**Pimpri : Representative**

**The PCMC commissioner, Shekhar Singh on Friday held a meeting with the medical department officials to discuss the potential sites, standards, and capacity of the proposed burn ward To provide speedy and comprehensive treatment to burn victims, the Pimpri-Chinchwad Municipal Corporation (PCMC) has initiated action to set up a dedicated burn ward in one of its civic hospitals.**




The PCMC commissioner, Shekhar Singh on Friday held a meeting with the medical department officials to discuss the potential sites, standards, and capacity of the proposed burn ward.

The meeting was attended by the additional commissioner of PCMC, Vijay Khorate, city engineer Makrand Nikam, medical officer Dr Laxman Gophane, additional medical officer Dr Abhay Dadewar, Yashwantrao Chavan Memorial Hospital (YCMH) dean Dr Rajendra Wabale, joint city engineer Dnyandev Jundhare, and medical officer Dr Shrikant Supekar.

"The proposed burn ward will focus on the treatment and rehabilitation of burn patients. It will require construction, alteration, renovation, or modification of the existing structure in the civic limits, as well as engagement of manpower and equipment purchase. Follow-up and rehabilitation services will also be provided to the patients," Singh said.

According to the officials, the proposed preliminary bed capacity of the burn ward is likely to range from 15-30 beds, a decision regarding which will be taken in the subsequent meetings. The next meeting and site visits will be conducted next week, where the commissioner will inspect the shortlisted sites.

### MLA Mahesh Landge highlighted the issue

The move comes after a fire incident was reported at a sparkling candle manufacturing unit located in Jyotiba Nagar at Talawade on December 8 during which six people died on the spot and five others succumbed to injuries while being treated at Sassoon General Hospital.The issue was also highlighted in the recent assembly session by MLA Mahesh Landge of Bhosari constituency. Landge has demanded a dedicated Burn hospital should be set up in PCMC.

## Central Railway's General Manager Conducts Safety-Focused Inspection on Pune-Lonavala Section

**Pimpri :**

**General Manager, Central Railway, Ram Karan Yadav, today led a thorough inspection of the Pune-Lonavala section in the Pune Division. Focusing on safety, he assessed track conditions, signalling systems, and Overhead Equipment (OHE) structures.**



The inspection, conducted alongside Indu Dubey, Divisional Railway Manager, Prakash Upadhyay CPM GSU, and Branch officers of Pune Division, emphasizes the commitment to ensuring the efficiency and safety of railway operations in the region.











**Pimpri:** M/s. Mentor MyBoard, Mumbai has awarded Ms. Nirja Saraf, Hon'ble Managing Director of Hindustan Antibiotics Ltd (HAL), Pune with 'ICONIC WOMEN DIRECTOR' of the year 2023 under the category Public Sector Undertakings (PSU).